**मालदीवच्या संरक्षण इमारतीचं पंतप्रधान आणि मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते संयुक्तपणे लोकार्पण (25 जुलै 2025)**

25 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि मालदीवचे महामहिम राष्ट्राध्यक्ष श्री. मोहम्मद मुइज्जू यांच्या हस्ते संयुक्तपणे सुसज्ज संरक्षण मंत्रालयाच्या इमारतीचं मालदीवच्या माले येथे उद्घाटन पार पडले.

2. हिंद महासागराला साक्षी असलेली अकरा मजली इमारत उभय देशांमधील दृढ आणि दीर्घकालीन संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याचे प्रतीक आहे.

3. संरक्षण मंत्रालयाची इमारत ही भारताच्या आर्थिक सहकार्यातून साकारली गेली आहे. मालदीवच्या संरक्षण आणि कायदा अंमलबजावणी प्राधिकरणाची क्षमता वाढविण्यासाठी इमारत आपलं योगदान देईल.

**माले**

25 जुलै 2025